## नियमित दिवाणी दावा क्र.१९७/२०२४ मधील निशाण क्र.५५ खालील आदेश

[ CNR No.MHKO090004862024 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फाचा आदेश रद्द करणेत यावा याकरिता सादर केला आहे. प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे महाराष्ट्र सरकारचे प्रतिनिधी असलेने वेगवेगळ्या सरकारी कामातून त्यांना सदरहू कामाची माहिती उपलब्ध न झालेने ते वेळेत हजर होवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द एकतर्फाचा आदेश पारीत करणेत आला.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादी यांनी नि.५८ अन्वये म्हणणे सादर केले आहे. वादींनी असे कथन केले आहे की, अर्जात नमूद कारणे ही खोट्या स्वरुपाची असून प्रतिवादी क्र.१ ते ३ चे प्रतिनिधी सरकारी अभियोक्ता हे कायमस्वरूपी कोर्टात हजर असतात. त्यामुळे विलंब होण्याचे कोणतेही कारण नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज दंडासह खारीज करणेत यावा.

३. मान्यत: प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वेळेत प्रकरणात हजर न झालेने त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करणेत आला आहे. तथापि, दरम्यानच्या काळात विधानसभा निवडणूक असल्याची बाब नाकारता येणार नाही. तसेच

निवडणुकीमध्ये शासकीय अधिकारी यांची नियुक्ती केली जाते, ही बाब देखील झालेला विलंब लक्षात घेताना विचारार्थ घ्यावी लागेल. सबब झालेला विलंब हा हेतुपुरस्सर नसल्याने प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुध्द झालेला आदेश रद्द करणेस न्यायसंगत ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द झालेला एकतर्फाचा आदेश रद्द करणेत येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.02.13 17:46:15 +0530

स्थळ : गडहिंग्लज. ( न. श्री. पुरी )

दिनांक : १३.०२.२०२५. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गडहिंग्लज